# प्रेस नोट

दि. ०३/०२/२०१८

भारत सरकार, अर्थ मंत्रालय, महसुल विभाग, नवी दिल्ली यांचेकडील अधिसुचना क्र. ३८ (ई), दि. १६/०१/२०१५ मधील सुचना व तरतुदीनुसार, तसेच मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि. महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जा.क्र. गुन्हे/विशा/अंमली पदार्थ समिती/६५४०/२००१, पुणे दि. ७/११/२००१ अन्वये पुणे शहर पोलीस, पुणे लोहमार्ग, पुणे ग्रामीण यांचे कार्यक्षेत्रातील जप्त अंमली पदार्थ नाश करण्याकरीता एक अध्यक्ष व तिन सदस्यांची समिती गठीत केलेली आहे. सदर समितीचे मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर हे अध्यक्ष असुन, १) मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर. २) मा. पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण. ३) मा. पोलीस अधिक्षक, पुणे लोहमार्ग हे सदस्य आहेत.

सदर समितीचे बैठकीमध्ये, दि. १६/०१/२०१५ चे अधिसुचनेनुसार न्यायनिर्णयावर प्रलंबित असलेल्या गुन्ह्यामधील जप्त अंमली पदार्थाची विल्हेवाट लावणेबाबतची कार्यवाही करणेबाबत मार्गदर्शन व सुचना निर्गमीत केलेल्या होत्या.

त्याअनुषंगाने, पुणे शहर पोलीस कार्यक्षेत्रातील एन.डी.पी.एस. ॲक्ट अन्वये दाखल असलेल्या गुन्ह्यापैकी सत्र न्यायालयात न्यायनिर्णयावर प्रलंबित असलेल्या ०९ गुन्ह्यांचे निकाल पुर्वी, अधिसुचना क्र. ३८ (ई), दि. १६/०१/२०१५ मधील तरतुदीनुसार, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ५२ - अ (२) अन्वये संबंधीत प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचेकडुन इन्व्हेंट्री करण्यात आलेली आहे. तसे प्रमाणपत्र हस्तगत करण्यात आलेले आहे.

त्यानुसार, सदर समितीच्या देखरेखेखाली तसेच श्री. जितेंद्र एम. जावळे, सहा. रासयनिक विश्लेषक, प्रादेशिक न्यायसहायक प्रयोगशाळा, पुणे., श्री. उपेंद्र कुलकर्णी, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण मंडळ व दोन पंचाचे उपस्थित पुणे शहर पोलीस कार्यक्षेत्रातील, गांजा – ५६२ किलो १६० ग्रॅम, गांजा मिक्स तरंग शिवामृत – ३५२ किलो ८३२ ग्रॅम, गांजा मिक्स फलादी चुर्ण – ११ किलो २५० ग्रॅम, गांजा मिक्स भांगयुक्त मँगो चुर्ण – ४४ किलो ४०० ग्रॅम, भांग – ११ किलो २५० ग्रॅम व चरस १ किलो २४० ग्रॅम हा जप्त अंमली पदार्थ मुद्देमाल दि. ०३/०२/२०१८ रोजी १६.५० वा. भारत फोर्ज लिमीटेड, मुंढवा, पुणे येथील भट्टीमध्ये भस्मीकरण पद्धतीने जाळुन नाश केला आहे. सदरची कार्यवाही पुणे शहरात २८ वर्षात प्रथमच करण्यात आलेली आहे.

वरील नमुद वजनाच्या अंमली पदार्थ मुद्देमालाची नाश करते वेळी असलेल्या बाजार भावाप्रमाणे एकुण कि. रु. १,१६,२३,५००/- आहे.

वरील नमुद कार्यवाही करणे संबंधाने मा. श्री. रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर व मा. श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. विवेक मुगळीकर, पोलीस निरीक्षक, एम.ओ.बी. (अति. कार्यभार) पी.सी.बी., गुन्हे शाखा., श्री. सुनिल दोरगे व श्रीमती. स्वाती थोरात, पोलीस निरीक्षक अंमली पदार्थ विरोधी पथक तसेच त्यांचेकडील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली आहे.